# समिती दर्पण

**नोव्हेंबर २०२३**

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www. samiti.org

### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी सहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉक्टर अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृह आहेत. त्यात ७५० विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा त्रिसूत्री वर समितीचे काम चालते.

# नृत्य, गायनातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन

## सहाय्यदाते, हितचिंतकांसाठी कार्यक्रम; तरुणाईसह ज्येष्ठांकडूनही दाद

महाराष्ट्रीय माणूस हा उत्सवप्रिय आहे. ऋतूंनुसार महाराष्ट्रात विविध सण साजरे केले जातात, जे प्रामुख्याने आपल्या कृषी संस्कृतीशी नाते सांगणारे असतात. आपल्या साऱ्या परंपरा, रितीरिवाजही मातीशी जोडलेले आहेत. महाराष्ट्राच्या या संस्कृतीचे दर्शन अशोक हांडे यांच्या 'चौरंग' संस्थेतर्फे आयोजित 'मराठी बाणा' या कार्यक्रमात नृत्य आणि गायनाच्या माध्यमातून आगळ्यावेगळ्या पद्धतीने झाले.

निमित्त होते विद्यार्थी साहाय्यक समितीचे साहाय्यदाते, हितचिंतक यांच्यासाठी दरवर्षीप्रमाणे आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे. बालगंधर्व रंगमंदिरात ३ नोव्हेंबरला हा कार्यक्रम झाला. हाऊसफुल झालेल्या या कार्यक्रमात लेखक, दिग्दर्शक, गायक अशोक हांडे यांच्यासह १२५ कलाकारांनी प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. जागरण, गोंधळ, लावणी, भारुड, वासुदेव, त्याचबरोबर कोळीनृत्य, बालेनृत्य, आदिवासी नृत्य, दहिहंडी नृत्य, शेतकरी गीत यांतून त्यांना मराठी संगीत आणि नृत्यकलेचा अस्सल बाज अनुभवता आला. एका क्षणाचीही विश्रांती न घेता एकापाठोपाठ एक सादर होणारी गीते आणि नृत्य, कलाकारांचा उत्साह, त्यांच्यातील एकसंधता, अशोक हांडे यांचे ओघवते निवेदन यांनी प्रेक्षकांना तीन तास खिळवून ठेवले. तरुणाईबरोबरच कार्यक्रमाला उपस्थित असलेले समितीचे ज्येष्ठ हितचिंतक आणि सहाय्यदात्यांनीही उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमाला समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कायम विश्वस्त भाऊसाहेब जाधव, खजिनदार संजय अमृते, विश्वस्त मकरंद फडके, रत्नाकर मते, तुकाराम गायकवाड, मनोज गायकवाड, विनया ठोंबरे, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, कार्यकर्ते, कर्मचारी, माजी विद्यार्थी उपस्थित होते. सुरुवातीला कार्यकर्त्या सुप्रिया केळवकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले व या कार्यक्रमाची भूमिका सांगितली. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी समितीच्या नवीन प्रकल्पांची माहिती दिली. समितीतील वास्तव्य, येथील संस्कार यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वात कसा बदल झाला, याविषयीचे अनुभव ओंकार शिंदे, जीवन बोधले, साक्षी चौहान, समीक्षा नाणेकर, आकांक्षा राऊत, साक्षी वाळके, ग्रंथाली देशमुख, प्रेरणा शेवाळे, सुमीत लोळगे, प्रताप मिरगे आदी आजी विद्यार्थ्यांनी सांगितले.

> समितीच्या कामाविषयी माहिती मिळाली होती. पण आज विद्यार्थ्यांचे अनुभव ऐकल्यानंतर येथे विद्यार्थी कशाप्रकारे घडत आहेत, हे लक्षात आले आणि समितीसाठी कार्यक्रम केल्याचे समाधान वाटले.
>
> **- अशोक हांडे**







# प्राचार्य भाऊसाहेब जाधव यांना कृतज्ञतेचे मानपत्र

विद्यार्थी हितासाठी सतत झगडणारे, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांचे पालक, मार्गदर्शक त्याचबरोबर विविध सामाजिक संस्थांना पाठबळ देणारे समितीचे कायम विश्वस्त प्राचार्य भाऊसाहेब जाधव यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित गौरव समारंभात समितीच्या वतीने मानपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. समितीच्या विविध प्रकल्पांसाठी त्यांच्याकडून मिळत असलेल्या योगदानाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. प्राचार्य जाधव यांचा अमृतमहोत्सवी गौरव समारंभ ४ नोव्हेंबर रोजी बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर, मराठवाडा मित्र मंडळ संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव गणगे, प्राचार्य जाधव यांच्या पत्नी डॉ. रंजना आदी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात मराठवाडा मित्रमंडळ संस्थेतर्फे समितीला ७५ हजार रुपयांची देणगी देण्यात आली, तसेच इतर १८ संस्थांनाही अशीच देणगी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्राचार्य जाधव यांच्यावरील 'बहुतांचे हितचिंतक' या गौरवांकाचे प्रकाशन ज्येष्ठ मूर्ती अभ्यासक डॉ. गो. ब. देगलूरकर यांच्या हस्ते झाले.




# पहिल्या विद्यार्थ्याच्या मुलाने व्यक्त केली कृतज्ञता

## डॉ. मिलिंद जगताप यांच्याकडून १० लाखांची देणगी

विद्यार्थी साहाय्यक समितीचे पहिले विद्यार्थी के. डी. जगताप यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे पुत्र सॉफ्टहार्ड ऑटोमेशन कंपनीचे डॉ. मिलिंद जगताप यांनी समितीला दहा लाख रुपयांची देणगी दिली. पुण्यात मुलींसाठी समिती उभारत असलेल्या वसतिगृहातील एका खोलीसाठी हा निधी दिला आहे. या देणगीचा धनादेश समितीचे कायम विश्वस्त भाऊसाहेब जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या कार्यक्रमात मिलिंद जगताप यांनी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्याकडे सुपूर्त केला.

समितीच्या कार्याची सुरुवात पाच विद्यार्थ्यांची वाराने जेवणाची सोय करण्यापासून झाली. त्या पाच विद्यार्थ्यांपैकी एक के. डी. जगताप होते. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला. समितीचे संस्थापक डॉ. अच्युतराव आपटे यांच्याशी त्यांचा स्नेह होता. समितीच्या उपक्रमांत त्यांचा कायम सहभाग असे.

> शिक्षण पूर्ण झाल्यावर माझ्या वडिलांनी व्यवसाय केला, जो उत्तरोत्तर यशाकडे झेपावत गेला. आज आमच्या सुखात समितीचे मोठे योगदान आहे.
>
> **- डॉ. मिलिंद जगताप,** सॉफ्टहार्ड ऑटोमेशन



# योग प्रशिक्षक होण्याची संधी

## प्राचीन संहिता गुरुकुलबरोबर सामंजस्य करार

तरुणांना योग आणि आयुर्वेदाचे प्रशिक्षण देऊन आयुष प्रशिक्षक आणि योग प्रशिक्षक घडविण्यासाठी विद्यार्थी साहाय्यक समिती आणि प्राचीन संहिता गुरुकुल यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, गुरुकुलचे प्रमुख हरीश पाटणकर यांनी या करारावर स्वाक्षरी केली. या करारानुसार समितीच्या वसतिगृहात केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकविला जाणार आहे. ज्यात समितीतील विद्यार्थ्यांना योग आणि आयुर्वेदाची ओळख होऊन त्याची त्यांना चांगल्या स्वास्थ्यासाठी मदत होईल तसेच आयुष प्रशिक्षक, योग प्रशिक्षक म्हणून देश- विदेशात करिअर करण्याची संधी मिळेल. याप्रसंगी समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, वैद्यकीय मार्गदर्शक डॉ. अभय व्यवहारे, गुरुकुलचे पंकज पाटणकर उपस्थित होते.



# नगरला वसतिगृहाच्या बांधकामाचा प्रारंभ

नगरमध्ये मुलांसाठी उभारण्यात येत असलेल्या कल्याणराव जाधव वसतिगृहाच्या बांधकामाचा प्रारंभ समितीचे संस्थापक डॉ. अच्युतराव आपटे यांच्या जन्मदिनी (८ नोव्हेंबर) झाला. समितीचे देणगीदार, दुबईस्थित उद्योजक विनोद जाधव यांचे बंधू विशाल जाधव यांनी पूजन करून, कुदळ मारून बांधकामाचा प्रारंभ केला. यावेळी स्नेहालय संस्थेचे गिरीश कुलकर्णी उपस्थित होते.

# रोटरी क्लब पुणे सनराईजकडून ५१ हजार रुपयांची देणगी

रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजचा पदग्रहण समारंभ नुकताच रेसिडेन्सी क्लब येथे झाला. या कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजच्या वतीने विद्यार्थी सहायक समितीला ५१ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. समारंभाचे प्रमुख पाहुणे पोलीस उपायुक्त संदीपसिंह गिल यांच्या हस्ते समितीचे कार्यकर्ते राजेंद्र ततार यांनी ही देणगी स्वीकारली. यावेळी क्लबचे अध्यक्ष विनीत अग्रवाल, उपाध्यक्ष रवी पतोडीया, एक्झिक्युटिव्ह सेक्रेटरी सिमरन जेठवानी आदी उपस्थित होते.

**अनुभव**

# जागृती यात्रेतून वेगळ्या भारताचे दर्शन

जागृती यात्रा २०२३ साठीच्या (World Largest Entrepreneural Train Journey) पात्रता फेरीत उत्तीर्ण झाल्याने यावर्षीच्या यात्रेसाठी माझी निवड झाली. माझ्यासाठी तो भाग्याचा क्षण ठरला. जागृती यात्रेचे यंदाचे सोळावे वर्ष. उत्तर प्रदेशचे शशांक मणी त्रिपाठी यांनी जागृती यात्रेची सुरुवात केली आणि त्या छोट्याश्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. चौदा दिवसांचा चौदा राज्यांचा हा रेल्वे प्रवास खूप काही शिकविणारा आणि नवनवीन अनुभवांनी समृद्ध करणारा होता. या यात्रेसाठी २२ राज्यांतून एकूण पाचशे जणांची निवड झाली होती. त्यात परदेशातील सत्तर जणांचा समावेश होता. प्रत्येक राज्याची निराळी संस्कृती, तेथील वैविध्य, रुढी- परंपरा यांची ओळख जागृती यात्रेच्या निमित्ताने झाली.

अंतराळ संशोधन करणाऱ्या जगातील अग्रगण्य संस्थांपैकी एक असलेल्या भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला (ISRO) दिलेली एक दिवसीय भेट या यात्रेतील विशेष आकर्षण ठरली. समितीच्या विद्यार्थ्यांची भोजन व्यवस्था पाहणाऱ्या अक्षय पात्र संस्थेच्या विशाखापट्टणम येथील केंद्राला भेट दिली. अरविंद आय केअर, श्रीसिटी, ग्राम विकास, साबरमती आश्रम, दिल्लीतील आंबेडकर भवन ही सर्व ठिकाणे पाहता आली. संबंधित राज्यातील संस्कृती, समस्या आणि त्यावर तेथीलच सर्वसामान्य लोकांनी शोधलेले उपाय हे सारे अगदी थक्क करणारे होते.



उत्तर प्रदेशातील देवरिया या छोट्याशा गावाला देखील आम्ही भेट दिली. तेथील लोकांशी संवाद साधला. त्यांची जीवनशैली, दिनक्रम जाणून घेतला. जागृती यात्रेचा प्रत्येक दिवस आणि त्या दिवसात अनुभवलेला प्रत्येक क्षण वेगळ्या भारताचे दर्शन घडवत होता. संपूर्ण यात्रेचे अगदी जेवणापासून स्वच्छतेपर्यंत चोख व्यवस्थापन होते. ही यात्रा माझ्या आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाला कलाटणी देणारी होती.

**- अंगारकी शरद मांडे,** सुमित्रा सदन

**समिती वृत्त**

# मुलामुलींनी तयार केले ७४० आकाशकंदील

समितीच्या कमवा- शिका योजनेअंतर्गत या वर्षी समितीच्या सर्व वसतिगृहांतील विद्यार्थी- विद्यार्थिनींनी दिवाळी आकाश कंदील तयार करण्याच्या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. आकाश कंदील तयार करण्याच्या उपक्रमाचे हे दुसरे वर्ष होते. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात कंदील तयार करण्याच्या उपक्रमास सुरुवात झाली. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी होता यावे, यासाठी कमवा- शिका उपसमितीच्या कार्यकर्त्यांनी यंदा आव्हानात्मक उद्दिष्ट ठेवले होते. तिन्ही वसतिगृहांत मिळून एकूण ५७५ लहान कंदील, तर १६५ मोठे कंदील तयार करण्यात आले. त्यापैकी ४१५ कंदिलांची विक्री झाली, त्यातून ४२ हजार ४५ रुपये जमा झाले. या उपक्रमात ४७ विद्यार्थी- विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. त्यांना कामाचा मोबदला देण्यात आला. उपक्रम यशस्वी करण्यासाठी हेमंत राजहंस, शुभांगी चिरपुटकर, सुनील शास्त्री, राजेंद्र ततार, श्रीधर कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. सर्व पर्यवेक्षकांनी उत्तम सहकार्य केले. या उपक्रमाच्या नियोजनात आशिष कुंभार (लजपत वसतिगृह), सानिका भुजबळ (आपटे वसतिगृह), गीतांजली चोले (सुमित्रा सदन) यांनी विशेष कामगिरी केली.

# चालीरिती, परंपरांविषयीच्या शंकांचे झाले निरसन

आपटे वसतिगृहात ५ नोव्हेंबरला गुरुश्री यांचे ट्रॅडिशन टू सायन्स (Tradition to Science) या विषयावर मार्गदर्शन सत्र झाले. वर्षानुवर्षे चालत आलेल्या चालीरिती, परंपरा न पाळण्याकडे सध्याच्या युवा पिढीचा कल दिसून येतो. याचे मुख्य कारण म्हणजे तरुणाईला पडणाऱ्या विविध प्रश्नांची उत्तरे, तसेच या परंपरांमागची त्यांना पटण्याजोगी कारणे सांगितली जात नाहीत. काही परंपरांचा काळानुसार अर्थ आणि औचित्य या दोन्ही अंगांनी नव्याने विचार होणे गरजचे आहे. विशेषत: आताच्या माहितीच्या प्रचंड विस्फोटापुढे असे प्रश्न विचारार्थ ठेवण्यामध्ये काहीच वावगे नाही, किंबहुना या आदानप्रदानामुळे का होईना, विविध विचारांचे लोक एकत्र येऊन यातून सुवर्णमध्य निघेल आणि समाजाच्या स्वास्थ्यासाठी तो एक स्वागतार्ह बदल असेल, अशी कित्येकांची भावना असते. गुरुश्रींनी विद्यार्थ्यांच्या याच प्रश्नांना त्यांना समजेल, अशा भाषेत वैज्ञानिक दृष्टिकोनातून उत्तरे दिली.

दररोज मंदिरात का जावे, मंदिरात जाताना घंटा का वाजवावी, प्रदक्षिणा का घालावी, ध्यान का करावे, अशा विविध प्रश्नांची पटण्याजोगी उत्तरे विद्यार्थ्यांना मिळाली. यापुढील काळात कोणत्याही गोष्टीचे कारण समजल्याशिवाय ती गोष्ट करणार नाही, अशी ग्वाही विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तराच्या सत्राच्या शेवटी दिली.








# वर्धमान ट्रस्टकडून १४ मुलींना शिष्यवृत्ती

पुण्यातील वर्धमान ट्रस्टच्या वतीने दरवर्षी विद्यार्थी- विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती दिली जाते. गेल्या १० वर्षांहून अधिक काळ समितीतील विद्यार्थ्यांनाही या शिष्यवृत्तीचा लाभ मिळत आहे. यंदा या शिष्यवृत्तीसाठी समितीतील १४ विद्यार्थिनींची निवड झाली असून त्यात १३ जणींना प्रत्येकी ५ हजार, तर एका विद्यार्थिनीला १० हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली आहे. या विद्यार्थिनींची नावे- किरण जाधव, आरती नवले, मेहंदी बडदे, रितू खुर्पे, प्रियांका कोरडे, लक्ष्मी जाधव, छकुली उरकुडे, सिद्धी फदाले, आकांक्षा शेवाळे, प्रिती उडदंगे, कल्याणी दिवटे, साधना परंडवाल, अनुष्का खांबे, प्रणाली झगडे.

**मैत्री पुस्तकांशी**

## तरुणांसाठी प्रेरणादायी




विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवनिर्माण या प्रत्येक क्षेत्राचे भारताच्या विकासामधील योगदान आणि त्याची सद्यस्थिती यावर "दुर्दम्य आशावादी डॉ. रघुनाथ माशेलकर" हे पुस्तक प्रकाश टाकते. संशोधक म्हणून काम करणाऱ्यांच्या दृष्टिकोनातून आणि विज्ञानक्षेत्राचे नेतृत्व करतानाच्या भूमिकेतून डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी दिलेल्या योगदानाचे यथार्थ चित्रण पुस्तकात केले आहे. १९७६ मध्ये सी.एस.आय.आर.च्या प्रयोगशाळेतील एक संशोधक ते सी.एस.आय.आर.चे २००६ पर्यंत महासंचालक हे त्यांचे योगदान भारताच्या वैज्ञानिक प्रगतीत खूप मोलाचे आहे. आपल्या सगळ्यांवर प्रभाव टाकणारे व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. माशेलकर. "दुर्दम्य आशावादी डॉ. रघुनाथ माशेलकर" हे पुस्तक नसून भारतीय तरुणांसाठी एक प्रेरणा आहे.

**पुस्तकांचे नाव - दुर्दम्य आशावादी डॉ. रघुनाथ माशेलकर**
**लेखक- डॉ. सागर देशपांडे**

**- वैभव काळे,** हरिभाऊ फाटक वसतिगृह

## अस्तित्व शोधण्याची धडपड



मुकेश नावाच्या तरुणाची स्वतःचे अस्तित्व शोधण्याची धडपड 'अस्तित्व' या कादंबरीत मांडली आहे. मुकेशची आई सुमतीअम्मा आणि वडील रावसाहेब. वडिलांच्या मृत्यूने मुकेश खूपच दुखी झालेला असतो. जेव्हा त्याला हे कळते की आपण त्यांचा मुलगाच नाही, तेव्हा त्याच्या जीवनात वादळ येते. रक्ताची नाती श्रेष्ठ की मानलेली, असा प्रश्न पडतो. सुमतीने सांगितल्याप्रमाणे तो आपल्या जन्मदात्या आईवडिलांना भेटायला निघतो. अमृतसरमध्ये राहणारे रुपिंदर आणि सुरिंदर हे त्याचे खरे जन्मदाते. पण रुपिंदरकडून त्याला वेगळेच समजते. आपल्या अस्तित्वाचा शोधात असणाऱ्या मुकेशच्या मनात अनेक प्रश्नांचे वादळ निर्माण होते. स्वतः अस्तित्वाचे कोडे सोडवताना त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. मात्र या सार्यांवर मात करून मुकेश आपल्या अस्तित्वाचा शोध घेतो. अत्यंत उत्कंठावर्धक अशी ही कादंबरी आहे.

**पुस्तकाचे नाव- अस्तित्व**
**लेखक- सुधा मूर्ती**

**- समीक्षा राठोड,** सुमित्रा सदन

**आवर्जून वाचावे असे काही**

### कृष्णाकाठ- लेखक- यशवंतराव चव्हाण

अतिशय निर्मल मनाच्या, सुसंस्कृत आणि सभ्य राजकारणी, समाजाची नाडी ओळखणाऱ्या लोकनेत्याचे हे आत्मचरित्र आहे.

### मैत्र- लेखक- पु ल देशपांडे

हे पुस्तक आपल्याला केवळ मैत्री कशी करायची, हे शिकवत नाही, तर केलेली मैत्री अखेरच्या श्वासापर्यंत कशी जपायची, हे शिकवते.

### उच्च शिक्षण- समस्या आणि प्रवाह - लेखक- डॉ अरुण निगवेकर

शिक्षण अर्थपूर्ण होण्यासाठीचा दृष्टिकोन, शिक्षणाचे माहेरघर म्हणजेच पुण्यातील शिक्षणाची सद्यस्थिती, एकविसाव्या शतकातील शिक्षणाचे बदलते स्वरूप त्यामुळे विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने आदी गोष्टी या पुस्तकात स्पष्ट केल्या आहेत.

### भ्रष्टाचार - भारताचा अंतर्गत शत्रू- लेखक- क. प. श्रीवास्तव

राजकारण, प्रशासन, पोलीस, न्यायव्यवस्था, खासगी क्षेत्र यांतील भ्रष्टाचाराचा मागोवा पुस्तकात घेतला आहे, त्याचबरोबर त्यावर उपायदेखील सुचवले आहेत.